ई मेलव्दारे

महाराष्ट्र शासन
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल, गटक्र. १ पुणे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ई-मेल:cmdt.srpf1.pune@mahapolice.gov.in
दुरध्वनी : ०२०-२६८६०२५०

जा.क्र. रारापोबल/गट-१/आस्था-१/सपोशि भरती -२०२१/संकेतस्थळ प्रसिध्दी/२०२३/५९९३ पुणे, दिनांक १८/०७/२०२३

प्रति,

पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
लक्षवेध :- Computer Cell, DGPMS

**संदर्भ :-** पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई यांचेकडील जा.क्र. प्रशि/पोशि.भरती/रिक्त पदे माहिती/१३२ २०२०/२५६५ मुंबई दिनांक ११/०७/२०२३ अन्वये.

**विषय :-** **सशस्त्र पोलीस भरती प्रक्रिया सन २०२१**
लेखी परीक्षा दिनांक व उमेदवारांकरिता सुचना प्रसिध्द होणेबाबत ...

----00-----

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सादर कि, या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपायांची ११९ रिक्त पदे भरणेकरिता उमेदवारांची शारिरीक मोजमाप, कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी प्रकिया दिनांक ०४/०३/२०२३ रोजी पुर्ण झाली असुन लेखी परिक्षे करीता १:१० प्रमाणात एकुण ३७९७ उमेदवार पात्र झाले आहेत.

सपोशि भरती सन-२०२१ लेखी परिक्षेकरीता पात्र ३७९७ उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक २३/०७/२०२३ रोजी आयोजित करणेबाबत संदर्भ पत्रान्वये आदेश प्राप्त झाले आहेत.

तरी सोबतच्या सुचना उमेदवारांच्या माहितीकरीता आपले www.mahapolice.gov.in संकेतस्थळावर पोलीस भरती या शिर्षा अंतर्गत प्रसिध्द होणेस विनंती आहे.

सोबत :- पृष्ठे - १

(शैलेश बलकवडे)
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १, पुणे

माहितीस्तव सादर,

पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

✉ ई-मेल:cmdt.srpf1.pune@mahapolice.gov.in
☎ दुरध्वनी : ०२०-२६८६०२५०

महाराष्ट्र शासन
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ पुणे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. रारापोबल/गट-१/आस्था-१/सपोशि भरती -२०२१/ले.परीक्षा सुचना/२०२३/ 5913 पुणे, दिनांक /०७/२०२३

18 JUL 2023

# सशस्त्र पोलीस शिपाई भरती - २०२१
# लेखी परीक्षेकरीता पात्र उमेदवारांकरिता सुचना

१. या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपायांची ११९ रिक्त पदे भरणेकरिता उमेदवारांची शारिरीक मोजमाप, कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी प्रकिया दिनांक ०४/०३/२०२३ रोजी पुर्ण झाली असुन लेखी परिक्षेकरीता १:१० प्रमाणात एकुण ३७९७ उमेदवार पात्र झाले असुन पात्र उमेदवारांची यादी http://www.maharashtrasrpf.gov.in व http://www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर पोलीस भरती शिर्षाअंतर्गत दिनांक १०/०३/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

२. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई यांचेकडील जा.क्र. प्रशि/पोशि.भरती/रिक्त पदे माहिती /१३२ २०२०/२५६५ मुंबई दिनांक १७/०७/२०२३ अन्वये सशस्त्र पोलीस शिपाई भरती- २०२१ लेखी परीक्षा **दिनांक २३/०७/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता** घेण्यात येणार असुन त्याबाबतचे प्रवेशपत्र महाआयटी कंपनी, मुंबई यांचेकडुन वाटप करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर बायोमॅट्रीक्स करीता सकाळी ०८:०० वा. उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

३. उमेदवारांना मैदानी चाचणीवेळी वाटप करण्यात आलेले प्रवेश पत्र तसेच लेखी परीक्षेकरीता वाटप करण्यात आलेले प्रवेशपत्र परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे अन्यथा परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

४. परीक्षा केद्रांच्या आवारात मित्र, नातेवाईक, पालक व अन्य अनाधिकृत व्यक्तीस प्रवेश अनुज्ञेय नाही.

५. पडताळणी व तपासणी संदर्भातील कार्यवाही पुर्ण झालेनंतर उमेदवार निश्चित केलेल्या बैठक क्रमांकावर जाईल.

६. ओळखीच्या पुराव्याबाबत - परीक्षेच्या वेळी ओळख पुराव्यासाठी आधारकार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, वाहन परवाना, महाविदयालयीन ओळखपत्र या पैकी किमान दोन ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे.

७. परीक्षा केद्रांवर एकदा प्रवेश केल्यानंतर प्रवेश संपेपर्यंत कोणत्याही परीस्थितीत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

८. मोबाईल फोन, मायक्रोफोन, ब्लु टुथ, स्मार्ट वॉच, डिजीटल गॅझेट, परीगणक, इलेक्ट्रीक उपकरणे तसेच दुरसंचार साधणे इ. परीक्षा केद्रांच्या परीसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास स्वत: जवळ बाळगण्यास, वापर करण्यास इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे.

९. परीक्षा केंद्रामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरिता सर्व परिक्षा केंद्रावर वर्गनिहाय सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले असुन ओळख पटविणेकरीता बायोमॅट्रीक्स हजेरी घेण्यात येणार असल्याने डमी उमेदवार आढळुन आल्यास तसेच परिक्षा दरम्यान गैरवर्तन केल्यास उमेदवारास परीक्षेकरीता अपात्र ठरवुन योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**शैलेश बलकवडे** (भा.पो.से.)
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १, पुणे

ठिकाण : पुणे.

COMMANDANT S.R.P.F., group I PUNE